# "किल्ले पन्हाळगड"

A Project Submitted to,

## VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR (AUTONOMOUS)

**For the Degree of Bachelor of Arts**

in

**History**

**By**

**( Pratik Ganesh Mane.)**

**Under the Guidance of**

**Dr. S. R. Kattimani**

Head Dept. of History, Vivekanand College, Kolhapur

**2023**

# प्रतिज्ञापत्र

मी, प्रतीक गणेश माने. विवेकानंद कॉलेज कोल्हापूर (स्वायत्त ) येथे कला शाखा भाग III च्या इतिहास विभागात शिकत असून असे प्रतिज्ञापत्र प्रस्तुत करतो की सत्र VI च्या अंतर्गत मुल्यांकनासाठी सादर केलेला प्रकल्प "किल्ले पन्हाळा" हा मी स्वतः क्षेत्रभेट घेवून व इतर उपलब्ध प्राथमिक व दुय्यम साधनांचा आढावा घेवून तयार केला आहे . पूर्वी सदर झालेल्या कोणत्याही प्रकल्प अहवालाची नक्कल करून अथवा इतर कोणाकडूनही लिहून घेवून हा प्रकल्प अहवाल सादर केलेला नाही .

दिनांक: १९ / ०४ / २०२३

विद्यार्थ्याचे सही: ____________

ठिकाण: कोल्हापूर

विद्यार्थ्याचे नाव: कु. प्रतीक गणेश माने.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD JUNE 1964
(Autonomous)

# प्रमाणपत्र

असे प्रमाणित करण्यात येते की, विवेकानंद कॉलेज कोल्हापूर (स्वायत्त ) येथे कला शाखा भाग III च्या इतिहास विभागात शिकत असलेला विद्यार्थी प्रतीक गणेश माने.

सत्र VI च्या अंतर्गत मुल्यांकनासाठी सादर केलेला प्रकल्प "किल्ले पन्हाळा" हा या विद्यार्थ्याने स्वतः तयार केलेला असून , आमच्या माहितीप्रमाणे हा प्रकल्प अहवाल यापूर्वी कोणत्याही पदवी अभ्यासक्रमासाठी सादर झालेला नाही. सदर प्रकल्प अहवाल आमच्या मार्गदर्शनाखाली समाधानकारकरीत्या पूर्ण झालेला आहे.

**दिनांक:** १९ / ०४ / २०२३

**ठिकाण:** कोल्हापूर

डॉ. एस . आर. कट्टीमनी
**विभाग प्रमुख,**
**इतिहास विभाग,**
**विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)**

प्रा. अश्विनी खवळे

प्रा. नम्रता ढाळे

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

# अनुक्रमणिका


| क्रमांक | प्रकल्पाचे नाव | पृष्ठ क्रमांक |
| --- | --- | --- |
| १) | प्रतिज्ञापत्र | २ |
| २) | प्रमाणपत्र | ३ |
| ३) | प्रस्तावना | ५ |
| ४ ) | प्रकल्पाची उद्दिष्टे | ६ |
| ५ ) | गृहीतके | ७ |
| ६ ) | पूर्व संशोधनाचा आढावा | ८ |
| ७ ) | संशोधन पद्धती | ९ |
| ८ ) | प्रकरण 1: पन्हाळगड स्थान | १० ते 11 |
| ९ ) | प्रकरण 2: पन्हाळा किल्ल्यावरील पाहण्यासारखी ठिकाणे | १२ ते १५ |
| १० ) | प्रकरण 3: पन्हाळ्याचा वेढा | १६ ते १७ |
| ११ ) | प्रकरण 4: पावनखिंड ची लढाई | १८ ते २२ |
| १२ ) | प्रकरण 5: निष्कर्ष | २३ |
| १३ ) | छायाचित्रे | २४ ते २६ |
| १४ ) | संदर्भ | २७ |


VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

# प्रस्तावना

पन्हाळा हे ठिकाण कोल्हापूर पासून 20 कि. मी. अंतरावर आहे. समुद्रसपाटी पासून 977.2 मी. ऊंचीवर असलेले, पन्हाळा हे मोहक प्रेक्षणीय स्थळ आहे जेथे आपण आपली सुट्टी घालवण्यासाठी जाऊ शकतो. पन्हाळा किल्ल्यामुळे व इतर डोंगरामुळे करड्या किंवा पांढऱ्या रंगाचा वारसा येथे जपला आहे. हा किल्ला राजा भोज यांनी 1178-1209 मध्ये बांधला आहे आणि डेक्कन किल्ल्यांमध्ये सर्वात मोठा किल्ला आहे. हा किल्ला रक्षन करणाऱ्या 7 कि. मी. उंचीच्या भक्कम भिंतींच्या आतील भागामध्ये आहे.

शिंवाजी महाराजांची आठवण करूण देणारा पन्हाळा हा एक ऐतिहासिक किल्ला आहे, सिध्दी जोहारने शिवाजी महाराजांच्या पन्हाळ गडाला चार महिने वेढा दिला होता, एका पावसाळ्या रात्री ह्या वेढ्यातून सुटुन शिवाजी महाराज विशाळगडाला गेले, सिध्दी जोहारने त्यांचा पाठलाग केला तेंव्हा बाजीप्रभु देशपांडे ह्यांनी पावनखिंड येथे त्याला आढवले, त्यामुळे शिवाजी महाराज सुरक्षित विशाळगडावर पोहचू शकले, परंतु बाजीप्रभु देशपांडे येथे धारातीर्थ पडले व मरण पावले.

स्वराज्याची राजधानी असलेल्या राजगड, रायगड आणि शिवनेरी जेथे त्यांनी आपलं लहानपण घालवले, पन्हाळा हा असा गड आहे की, जेथे शिवाजी महाराजांनी 500 रहिवासी होते.

ESTD JUNE 1964

# प्रकल्पाची उद्दिष्टे -

1 ) पन्हाळा गडावरील ऐतिहासिक महत्त्व अभ्यासणे .

2 ) पन्हाळगड व पावनखिंड येथे घडलेल्या तसेच ऐतिहासिक दृष्टीने महत्त्वाच्या बाबींचा आढावा घेणे .

3) पन्हाळगड केव्हा व कोणी बांधला याचा अभ्यास करणे .

4) मराठा साम्राज्याचे धाडसी व पराक्रमी योधा बाजीप्रभु यांच्या अतुलनीय पराक्रमाबद्दल माहिती जाणून घेणे.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

# गृहीतके -

1] पन्हाळगड या परिसरास कोल्हापूर जिल्ह्यातील ऐतिहासिक व पर्यटन स्थळ म्हणून ओळखले जाते.

2] या ठिकाणी शाळेची मुले दरवर्षी सहलीचे नियोजन करून इतिहासाला उजाळा दिला जातो.

3] पन्हाळगड हा किल्ला कोल्हापूर जिल्ह्यातील पर्यटनात भर टाकत आहे.

4] मराठा सैनिकांच्या पराक्रमाने व त्याच्या पवित्र रक्ताने हा गड पावन झाला आहे.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD JUNE 1964
(Autonomous)

# पूर्व संशोधनाचा आढावा

• किल्ले पन्हाळा या पुस्तकात रमेश जि. नेवसे यांनी पन्हाळा गडा बद्दल थोडक्यात माहिती दिली आहे.

• किल्ले पन्हाळगड ते विशाळगड

या पुस्तकात मु.गो. गुळवणी यांनी मराठा साम्राज्यातील वीर योद्धा यांच्या कर्तृत्वा बद्दल थोडक्यात नोंदणी केली आहे.

• पर्णालपर्वत पन्हाळगड या

पुस्तकात इंद्रजीत सावंत यांनी शिवरायांच्या व पन्हाळ गडाच्या जीवनचरित्राबद्दल माहिती दिली आहे.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

# संशोधन पद्धती:

प्रकल्पासाठी ऐतिहासिक व वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. तसेच प्रस्तुत लघु प्रकल्पाशी संबंधित प्राथमिक, दुय्यम साधनांचा अभ्यासाद्वारा याचा अभ्यास केला आहे.

प्रस्तुत प्रकल्पासाठी वर्तमानपत्रातील फोटो, कात्रण, माहितीद्वारा अभ्यास केला आहे.


VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

## पन्हाळा किल्ला

पन्हाळा किल्ला कोल्हापूर च्या उत्तरेला 20 कि.मी. अंतरावर आहे, हा गड सह्याद्रीच्या पर्वत रांगांमध्ये येतो, हा किल्ला जमीन सपाटीपासून 400 मी. ऊंचीवर येतो. युध्दकलेच्या दृष्टीने महत्त्वाचा असा पन्हाळा गड आहे, त्याच्यातील एक जो महत्त्वाची भूमिका निभावतो तो पश्चिम घाट आहे, जो मोठा व इतिहासकालीन आहे. शिलाहारा मुख्य राज्यकर्ता भोज II (1178 – 1209) यांच्या नंतर ही कारकीर्द यादवांच्याकडे स्फूर्त करण्यात आली. हे एक महत्त्वाचे ठिकाण आहे, बिदारचे बहमणीस; महमुद गवान जे एक हुशार सेनापती होते त्यांनी छावणीपासून दूर सैन्य ठेवून पावसाळ्याच्या कालावधीत 1469 मध्ये ह्या गडावर हल्ला केला. पुढे जाऊन 16 व्या शतकात हा किल्ला विजापूर ह्यांनी काबीज केला.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

आदिलशाहा  यांनी ह्या गडाचे काही चबुतरे व दरवाजे करून घेतले. त्यानंतर 1659 मध्ये शिवाजी महाराजांनी हा किल्ला काबीज केला, व पूर्णपणे प्रस्थापित होऊ पर्यंत गडाच्या दुरूस्तीचे काम थांबवले.



VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

# प्रकरण २: पन्हाळा किल्लावरील पहाण्यासारखी ठिकाणे

## 1) बाजीप्रभूंचा पुतळा

एसटी बस स्टॉप वरून थोडे समोर चौकात गेल्यावर बाजीप्रभु देशपांडे यांचा पुतळा आहे.

## 2) राजवाडा

हा राजवाडा राणी ताराबाई यांचा आहे. इथूनच राणी ताराबाई यांनी आपला राज्यकारभार चालवला होता. वाडा एकदम बघण्यासारखा आहे व त्यातील देवघर अगदी सुंदर आहेत. पण आता तिथे पन्हाळा हायस्कूल आहे.

## 3)महालक्ष्मी मंदिर

राजवाड्यातून बाहेर निघाल्यावर नेहरू उद्यानाकडे चालत गेल्यावर खालच्या बाजूस जे मंदिर लागते ते महालक्ष्मी मंदिर होय. हे गडावरील सर्वात प्राचीन मंदिर आहे असे म्हटले जाते कारण की याच्या बांधणीवरून ते साधारणपणे 1000 वर्षांपूर्वीचे असावे असा अंदाज लावले जाते.

## 4) सज्जाकोठी

राणी ताराबाईंच्या वाड्यावरून समोर गेल्यावर सज्जा कोठी इमारत दिसते. याच इमारतीमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी छत्रपती संभाजी महाराजांना प्रांताचा कारभार पाहण्यासाठी ठेवले होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या गुप्त खलबते याच इमारतीमध्ये चालत.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)



सज्जाकोठी

## 5) राजदिंडी मार्ग

ही वाट गडाखाली उतरते. याच वाटेचा उपयोग करून छत्रपती शिवाजी महाराज सिद्धी जोहरच्या वेडा तोडण्यात यशस्वी झाले. हीच वाट विशाळगडावर जाण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांना उपयोगी पडली. याच वाटेने 45 मैलांचे अंतर कापून छत्रपती शिवाजी महाराज विशाळगडावर सुखरूप पोहोचले.

## 6) चार दरवाजा

हा दरवाजा पूर्वेकडील महत्त्वाचा दरवाजा होय. इसवी सन 1844 मध्ये हा दरवाजा इंग्रजांनी पाडून टाकला. चार दरवाजाचे थोडेसे भग्नावशेष आज पण शिल्लक आहेत

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

## 6)शिवा काशीद पुतळा

चार दरवाजाला लागूनच शिवा काशीद यांचा पुतळा आहे.

## 7)सोमाळे तलाव

गडाच्या पेठा ला लागून एक मोठे तलाव आहे तेच हे सोमाळे तलाव होय.

## 8)सोमेश्वर मंदिर




सोमेश्वर मंदिर

तलावाच्या जवळच सोमेश्वर मंदिर आहे. सोमेश्वर मंदिर आला छत्रपती शिवाजी महाराजांनी आणि त्यांच्या संपूर्ण मावळयांनी लक्ष चाफ्याची फुले वाहिली होती.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

9) रामचंद्रपंत अमात्य यांची समाधी

सोमेश्वर तलावापासून थोडे समोर गेल्यावर दोन समाध्या दिसतात. त्यातील उजवीकडेची समाधीही रामचंद्रपंत अमात्य यांचे आहे व बाजू ची समाधी त्यांच्या पत्नीची समाधी आहे.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

# प्रकरण ३: पन्हाळ्याचा वेढा

10 नोव्हेंबर 1659 रोजी शिवाजी महाराजांनी अफझलखानाचा वध केला. यानंतर आदिलशाही मुलुख काबीज करीत मराठी सैन्य वेगाने निघाले होते. वर्ष संपताना त्यांनी अफझलखानाचा मुलगा फाजलखान आणि रुस्तमे झमान यांना हरवून कोल्हापूर जवळचा पन्हाळा जिंकून घेतला. आदिलशहाने यांचे पारिपत्य करण्यासाठी सिद्दी जोहरला दक्षिणेकडून चाल करण्यास सांगीतले व त्याच वेळी उत्तरेकडून मुघलांशी जवळीक बांधून हल्ला करविला. यावेळी शिवाजी महाराज पन्हाळ्यावर होते. इ.स. 2 मार्च 1660 सुरुवातीस सिद्दी जोहरने पन्हाळ्याला वेढा घातला. आणि किल्ल्याची रसद पूर्ण कापली यावेळी पन्हाळा किल्ल्यावर छत्रपती शिवाजीराजे अडकून पडले. मुसळधार पाऊस चालू असताना सुद्धा सिद्दी काही केल्या वेढा सोडावयास तयार नव्हता. महाराजांनी या कठीण प्रसंगी सिद्दीस तहाचा निरोप दिला होता यामुळे सिद्दी गाफील राहिला अनेक महिन्यांच्या वधानंतर पन्हाळगड ची स्थिती बिकट झाली आणि किल्ला शिकस्त होणार असे दिसू लागले.

2 . पन्हाळ्यावरील इंग्रज हल्ले

सिद्दी जोहरने राजापूरच्या इंग्रजांकडून पन्हाळ्यावर हल्ले करण्यासाठी आधुनिक तोफगोळे विकत घेतले. पन्हाळ्यावर हल्ले करत असताना इंग्रजांनी आपला ध्वज फडकविला. शिवाजी महाराजांनी वर्ष अखेरी याचा सूड म्हणून राजापूरची वखार लुटली.

3 . पन्हाळ्यांवरून सुटका

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

पन्हाळ्यावरील जमा केलेले धान्य व दारूगोळा चार महिन्यापेक्षा अधिक काळ पुरण्यासारखा नव्हता. तसेच पुणे प्रांतावर मोगल सरदार शाहिस्तेखान चाल करून आल्याने वेढ्यातून बाहेर पडल्याशिवाय छत्रपती शिवाजी महाराजांना पर्याय नव्हता. छत्रपती शिवरायांनी मुत्सद्देगिरीचा वापर करून गंगाधर पंताना तहाची बोलणी करण्यासाठी त्यांना सिद्दी जोहरकडे पाठवले या कठीण प्रसंगी महाराजांनी सिद्दी तहाचा निरोप पाठवल्यामुळे सिद्दी गाफील राहिला. तिकडे नियोजनानुसार शिवाजी महाराजांसारखा पेहराव करून शिवा काशिद या मावळ्याने स्वतः सिद्दी जोहर यास तहाची बोलणी करण्यात गुंतवून छत्रपतींना पन्हाळ्यांहून निसटण्यात पुरेसा अवधी दिला.



शिवा काशिद

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

# प्रकरण 4 : पावनखिंड ची लढाई -



## पावनखिंड

पावनखिंड किंवा घोडखिंड ही महाराष्ट्रात पन्हाळगड आणि विशाळगड यांच्यामधील रस्त्यावर असलेली खिंड आहे. अतिशय अवघड व अरूंद असलेली ही खिंड या दोन्ही किल्ल्यांमधील अंतर कमी करते. दोन उंच डोंगरांच्या मध्ये असलेल्या या खिंडीतील वाट इतकी अरूंद आहे की येथून एकावेळी फक्त एक घोडेस्वार पार जाऊ शकतो. हत्ती, मेणे किंवा इतर वाहनांनी ही खिंड पार करणे अशक्य आहे. यामुळे या खिंडीला घोडखिंड असे नाव आहे. १३ जुलै, १६६० रोजी पन्हाळगडाला पडलेल्या वेढ्यातून निसटून निघालेले शिवाजी महाराज

COLLEGE ESTD JUNE


विशाळगडाकडे जात असताना सिद्दी मसूदच्या सैन्याने त्यांना येथे गाठले. तेव्हा झालेल्या निकराच्या लढाईत बाजी प्रभू देशपांडे, त्यांचे भाऊ फुलाजी देशपांडे व त्यांच्यासह मोजक्या सैनिकांनी ही खिंड जबरी लढवली व आदिलशाही सैन्याला थोपवून धरले. यामुळे शिवाजी महाराजांना विशाळगड गाठणे शक्य झाले. यात बाजीप्रभु देशपांडे व त्यांच्यासह मागे थांबून शेवटचा एल्गार करणाऱ्या त्यांच्या सैन्याने मरण पत्करले. त्यांच्या या बलिदानाची आठवण म्हणून या खिंडीला पावनखिंड असे म्हटले जाते.




बाजीप्रभु देशपांडे

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

इ.स.२ मार्च १६६० रोजी सिद्दी जोहरने पन्हाळयास वेढा दिला होता यावेळी छत्रपती शिवाजीराजे पन्हाळा किल्ल्यावर अडकून पडले होते. मुसळधार पावसात सुद्धा सिद्दी वेढा सोडावयास तयार नव्हता. या कठीण प्रसंगी महाराजांनी सिद्धीस तहाचा निरोप धाडला त्यामुळे सिद्धी गाफील राहिला. शिवा काशीद नावाच्या मावळयाने छत्रपतींच्या वेशात सिद्दी जौहर यास तहाची बोलणी करण्यात गुंतवून छत्रपतींना पन्हाळयांहून निसटण्यास पुरेसा अवधी दिला. शिवा काशीदचे खरे रूप कळल्यावर सिद्धीने त्यांस ठार केले,तोवर छत्रपती विशाळगडाच्या वाटेवर होते.



## शिवा काशीद

छत्रपती शिवरायांनी पन्हाळयांवरून, विशाळगडाकडे पलायन केल्याचे समजल्यानंतर सिद्दीने, सिद्दी मसूदला छत्रपतींच्या मागावर पाठवले व त्यांचा पाठलाग चालू झाला. मसूदच्या सैन्याने मराठ्यांना घोडखिंडीत गाठले,अशावेळी

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

बाजीप्रभूंनी छत्रपतींना विशाळगडावर पोहोचून तोफानी इशारा करत नाहीत तोवर ही खिंड लढवली जाईल असे सांगीतले. घोडखिंडीतील अतिशय चिंचोळ्या वाटेमुळे मराठ्यांनी मसूदच्या सैनिकांची कत्तल आरंभली,शरीराला असंख्य जखमा झाल्या असतानाही बाजीप्रभु, फुलाजी, संभाजी जाधव, बांदल यांनी मोठा पराक्रम गाजविला.

महाराज विशाळगडावर पोहोचल्यानंतर तोफांचा गजर झाला. इकडे घोडखिंडीत बाजीप्रभूंनी तोफांचा आवाज ऐकल्यानंतरच समाधानाने आपला जीव सोडला. या युद्धात मराठ्यांचे जवळपास सर्वच ३०० मावळे कामी आले तर मसूदचे जवळपास ३००० सैनिक मारले गेले. बाजीप्रभु व इतर मावळयांच्या पराक्रमाने घोडखिंड पावनखिंड म्हणून इतिहासात अमर झाली.

पावनखिंडीच्या लढाईचा उल्लेख शिवकालीन ऐतिहासिक कागदपत्रात सापडत नाही. शिवभारतप्रमाणे ही लढाई विशाळगडच्या पायथ्याशी गजापूरच्या घाटात झाली. तरी पण त्यामुळे बाजी प्रभू, फुलाजी आणि बांदल सेनेचा पराक्रम अजिबात कमी होत नाही. त्यांचे शौर्य आणि बलिदान अलौकिक आहे.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)



VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD JUNE 1964
(Autonomous)

# प्रकरण : 5 निष्कर्ष

या प्रकल्पातून अनेक प्रकारे महत्त्वाचे निष्कर्ष निघाले. या प्रकल्पाद्वारा आपल्याला शिवाजी महाराजांच्या यांच्या देदीप्यमान देशभक्तीचे अतुलनीय शौर्याचे वीरश्रीपूर्ण चित्र दिसून येते. तसेच इतिहासाच्या दृष्टिकोनातून पन्हाळगडाचे महत्त्व लक्षात येते.


1. बाजीप्रभु देशपांडे यांनी प्राणपणाला लावून घोडखिंड लढवली आणि राजांचे प्राण वाचवले, यातूनच आपल्याला आपल्या राजाविषयी प्रामाणिकपणा दिसून येतो.


2. त्याच प्रमाणे छत्रपती शिवाजी महाराजांना स्वराज्य निर्माण करण्यासाठी जे किल्ले निवडले ते अतिशय अवघड व जोखमीचे होते.


3. महाराजांप्रति स्वामीनिष्ठा, स्वराज्यनिष्ठा प्रत्येक मावळ्यामध्ये एवढी होती की, छत्रपतींच्या एका शब्दावर सर्व मावळे कोणतीही मोहिमेला तयार असत. म्हणूनच धन्य ते मावळे जे छत्रपती शिवाजी महाराजांच्या एका शब्दासाठी मरणाला सामोरे जाण्यास तयार होते अशी निष्ठा आजच्या काळात पाहायला मिळणे अशक्यच आहे.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964


# छायाचित्रे









VIVEKANAND COLLEGE KOLH
ESTD
JUNE
1964




VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)




VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD
JUNE
1964
(Autonomous)

# संदर्भ -

1) किल्ले पन्हाळा , लेखकाचे नाव - रमेश जी. नेवसे

प्रकाशक : श्री राजमुद्रा प्रकाशन

भाषा : मराठी

2) किल्ले पन्हाळगड ते विशाळगड , लेखकाचे नाव : मु. गो. गुळवणी

प्रकाशक : शिल्पा प्रकाशन

भाषा : मराठी

3) पर्णालपर्वत, पन्हाळगड, लेखक : इंद्रजीत सावंत

4) साद पन्हाळा ते विशाळगडची, लेखक : महेश म. तेइळकर

प्रकाशक : मेहता पब्लिशिंग हाऊस.

COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964